जनहिताय सर्वदा

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दूरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७ Email ID :dokh.rfd@maharashtra.gov.in

---

क्रमांक: गौखनि-३०/०७२६/ई. प्र.क्र. १७७८३८८/खनिज-१ **दिनांक:- १३ ऑगस्ट, २०२६**

विषय:- गौण खनिज- नाशिक
सन २०२५-२६ करीता मौजे लोहणेर, ता. देवळा, जि. नाशिक येथील वाळू गट क्र. ९५५, ९५६, ९५७, ९५८, ९७१, ९७२ व ९७३) या वाळू गटापोटी लिलावधारकाने शासन जमा केलेली रक्कम परत करणेबाबत.
सुनंदाई बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. दिपक सुधाकर पाटील

शासन ज्ञापन :-

सन २०२५-२६ करीता मौजे लोहणेर, ता. देवळा, जि. नाशिक हा वाळू गट सुनंदाई बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. दिपक सुधाकर पाटील यांना रुपये ६७,६८,७८०/- इतक्या सर्वोच्च बोलीस जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक १८.०३.२०२६ च्या आदेशान्वये मंजूर केला होता. तथापि, ग्रामस्थांच्या विरोधामुळे सदर वाळू गटाचा ताबा लिलावधारक यांना देता आलेला नाही.

०२. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय वाळू संनियंत्रण समितीची बैठक दि.२३/०६/२०२६ रोजी झाली असून बैठकीमध्ये स्थानिक ग्रामस्थांच्या तीव्र विरोधामुळे सदर गटाचा ताबा लिलावधारकास देणे शक्य झाले नसल्याने लिलावधारकाने या गटासाठी शासन जमा केलेली रक्कम नियमानुसार परत करण्याचा निर्णय घेतला आहे.

०३. सबब, वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ मधील तरतूदी, जिल्हाधिकारी, नाशिक यांचा दिनांक ०७.०७.२०२६ रोजीचा अहवाल, जिल्हास्तरीय वाळू संनियंत्रण समितीने घेतलेला निर्णय विचारात घेता, लिलावधारक सुनंदाई बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. दिपक सुधाकर यांनी सन २०२५-२६ करीता मौजे लोहणेर, ता. देवळा, जि. नाशिक या वाळू गटाच्या लिलावाकरिता शासनाकडे जमा कलेली संपूर्ण रक्कम रुपये ६७,६८,७८०/- (रुपये सदुसष्ठ लाख अडूसष्ठ हजार सातशे ऐंशी फक्त) इतकी रक्कम लिलावधारकास अदा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

०४. सबब, लिलावधारक सुनंदाई बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. दिपक सुधाकर, यांनी लिलावाची संपुर्ण रक्कम प्रत्यक्षात शासनाकडे जमा केल्याची व यापुर्वी ही रक्कम अदा केलेली नाही, याची खातरजमा करुन घेण्याच्या अटीवर लिलावाकरिता,- लिलावधारकाने शासनाकडे जमा कलेली संपूर्ण रक्कम रुपये ६७,६८,७८०/- (रुपये सदुसष्ठ लाख अडूसष्ठ हजार सातशे ऐंशी फक्त) इतकी अदा करण्यास या ज्ञापनाद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

०५. या बाबीवर होणारा खर्च सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता "०८५३-अलोहयुक्त खाणी व धातुशास्त्रीय उद्योग” १०२- खनिजाबाबत सवलत फी व स्वामित्वधन, ९००, अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग-वजा परतावे (००) (०१) वजा परतावे (०८५३ ००८६) खाली वजा परतावे या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अंदाजपत्रकीय तरतूदीमधून खर्ची टाकून भागविण्यात यावा.

०६. सदर शासन ज्ञापन, वित्त विभागाच्या क्र.विअप्र-२०१९/प्र.क्र.२०/२०१९/विनियम, दि.८/८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८, भाग-२ नुसार महसूल व वन विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०७. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०८१३१५४८२८५६४८ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RATHOD UMESH DHARMA

Digitally signed by RATHOD UMESH DHARMA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department,
2.5.4.20=FA30EEF6A9E239E9B4F8129A1B10556B20319BBEC898D94F4E0E028A365FCEC5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3667A98F6D3E5F0ED5652697D674C2EB05D852DD34F87FDA6A20696C80787981, cn=RATHOD UMESH DHARMA
Date: 2026.08.13 15:49:32 +05'30'

(डॉ. उमेश ध. राठोड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

जिल्हाधिकारी, नाशिक

प्रत:-

१) विभागीय आयुक्त, नाशिक.
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई-४०००२०.
३) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)- १, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई-४०००२०.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक
५) वित्त विभाग (व्यय-९/अर्थसंकल्प-३/६/१४ कार्यासने) मंत्रालय, मुंबई-४०००३२
६) कार्यासन अधिकारी (कार्यासन ब-१),
७) निवडनस्ती.